# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 22/04/2023 (शनिवार) दुपार

## चोरी

**१) पो.स्टे. बेला** :— अंतर्गत १२ किमी अंतरावर मौजा आलागोंदी येथे दिनांक १७/०४/२०२३ चे १८/०० ते २०/०४/२०२३ चे १५/०० वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे— मदन आकांतराव माटे, वय ६० वर्षे, रा. प्लाट नं. ३५ वराडे पाटील लेआउट प्रताप नगर नागपुर यांच्या शेतामध्ये फळांची झाडे असुन त्या शेतामध्ये जंगली जनावरे येऊ नये म्हणुन तारांचे कंपाउंड तयार करून अंदाजे १००००/—रू किंमतीची सोलर झटका मशीन ताराला लावलेली होती यातील घटना ता वेळी व ठिकाणी कोणीतरी अज्ञात ईसमाने ती चोरून नेली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. बेला येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास नापोशी सुरेद्र ठाकरे ब. नं. २०२७ मो. नं. ९२८४८६५३६६ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. सावनेर** :— अंतर्गत जयस्वाल हॉस्पीटल जवळ सावनेर येथे दिनांक २१/०४/२०२३ चे १६/४५ ते १७/३० वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे— सौ सारीका नाना धुर्वे, वय ४० वर्ष रा. कील्ला पुरा सावनेर हिने घर बांधकामा करीता बॅकेतुन व गटातुन एकुण ४५०००/— रूपये काढले व पर्स मध्ये ठेवुन पर्स जवळील निळया रंगाचे थैलीत ठेवली असता यातील नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी कोणीतरी अज्ञात चोरटयांनी स्वत:चे आर्थिक फायदयासाठी थैलीतील पर्स काढुन चोरी करून घेवुन गेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. **सावनेर** येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा हावरे मो. नं. ९९२३३६५६२२ हे करीत आहे.

**३) पो.स्टे. कळमेश्वर** :— अंतर्गत मौजा लींगा लाडई येथे दिनांक २१.०४.२०२३ चे ०१.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे— दिलीप श्रीकृष्णराव वाघाडे, वय ३८ वर्ष, रा. कळमेश्वर वार्ड क्र. १५ हा रिलायन्स जीओ कळमेश्वर हददीत टेकनीशियनचे काम करत असुन घटना ता. वेळी व ठिकाणी फिर्यादी आपल्या घरी जेवन करून झोपला होता त्यावेळी त्याच्या मोबाईलवर ऑफीस मधुन मौजा लाडई शिवारातील रिलायन्स जीओच्या टॉवरचा दरवाचा उघडण्याचा अलार्म कॉल आला यावरून फिर्यादी लगेच झोपेतुन उठुन मोजा लाडई शिवारात रात्री १२.३० वा. जावुन पाहीले असता फिर्यादीला vision 100 ah कंपनीच्या ०२ बॅटऱ्या अंदाजे किंमती ६२०००/— रू असुन कोणीतरी अज्ञात इसमाने चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा. १६७८ धनराज भुक्ते पो.स्टे. कळमेश्वर हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर